**ठळक बातम्या**

- २००८ मधल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सात आरोपींची ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता

- छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात उमेदवारांनी केलेल्या तक्रारींनंतर निवडणूक आयोगाकडून मतदान यंत्रांची तपासणी, VVPAT आणि मतदान यंत्रातल्या मतांमध्ये तफावत आढळली नसल्याचा निर्वाळा

**आणि**

- बुद्धीबळ विश्वचषक विजेती दिव्या देशमुखला ३ कोटी रुपयांचा पुरस्कार देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

<><><><>

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व सात आरोपींची आज विशेष एनआयए न्यायालयाने ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. सुमारे १७ वर्षे चाललेल्या या प्रदीर्घ खटल्यानंतर न्यायालयाने हा आदेश दिला. आरोपींमध्ये माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा समावेश आहे. सरकारी वकिलांनी कोणताही ठोस पुरावा सादर न केल्यामुळे सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करत असल्याचं विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आपल्या निकालात नमूद केलं. २००८ मध्ये नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथं हा बॉम्बस्फोट झाला होता. त्यात सहा जणांचा मृत्यू झाला, तर १०० हून अधिक जण जखमी झाले होते. या प्रकरणाचा सुरुवातीचा तपास एटीएस अर्थात दहशतवाद विरोधी पथकानं केला होता. या प्रकरणी १२ जणांना अटक झाली होती. त्यानंतर हा तपास एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आला होता. या प्रकरणातला अंतिम युक्तिवाद एप्रिल २०२४ मध्ये संपला आणि न्यायालयानं १९ एप्रिल रोजी या खटल्याचा निकाल राखून ठेवला होता.

खटल्यातल्या १२ आरोपींपैकी ३ जणांची यापूर्वीच निर्दोष सुटका झाली होती. तर दोन आरोपींवर फक्त शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत खटला चालवला जाईल, असं न्यायालयानं आज स्पष्ट केलं.

**<><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या निकालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दहशतवाद कधीच भगवा नव्हता आणि नसेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

**- - होल्ड - मुख्यमंत्री- -**

दहशतवादाला रंग नसतो, अशी प्रतिक्रीया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे. निकालाविषयी बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

**- - होल्ड - पृथ्वीराज चव्हाण - -**

२००६मधे मुंबईतल्या उपनगरीय गाड्यांमधे झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाविरोधात राज्यसरकारनं सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे, त्या धर्तीवर मालेगाव स्फोट खटल्यातल्या एनआयए न्यायालयाच्या निर्णयाला राज्यसरकार आव्हान देणार का ? असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला आहे.

**<><><><>**

मालेगावात या निकालानंतर संमिश्र प्रतिक्रीया उमटल्या. हिंदुत्ववादी संघटनांनी निकालाचं स्वागत करत जल्लोष केला. शहराच्या पूर्व भागात या निकालाचा निषेध करण्यात आला. मालेगाव बॉम्बस्फोटात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांनी निर्णयामुळे निराश झाल्याचं सांगितलं. या निकालाविरोधात उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय आणि जमियत उलेमा ए हिंदकडे दाद मागण्याचा आपला मनोदय असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं छत्रपती संभाजीनगर ते परभणी दरम्यान रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी दिली आहे. त्यासाठी सुमारे २ हजार २०० कोटी रुपये खर्च येणार आहे. याशिवाय इटारसी - नागपूर दरम्यान सुमारे साडे ५ हजार कोटी रुपये खर्च करुन चौथा रेल्वे मार्ग टाकला जाणार आहे. माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. प्रधानमंत्री कृषी संपदा योजनेसाठी सुमारे साडे

६ हजार कोटी रुपये आणि National Cooperative Development Corporation ला २ हजार कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णयही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज घेतला.

<><><><>

गेल्यावर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये छेडछाड झाल्याच्या तक्रारी निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार संबंधित मतदार संघांमधल्या मतदान यंत्रांच्या चाचण्या राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी पूर्ण केल्या. त्यात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र छेडछाडीपासून सुरक्षित असल्याचं सिद्ध झालं, असं निवडणूक आयोगानं आज प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

याबाबत दहा उमेदवारांकडून तक्रारी आल्या होत्या. त्यापैकी आठ अर्जदारांच्या उपस्थितीत चाचण्या घेण्यात आल्या. दोन अर्जदार उपस्थित राहिले नाहीत. यात दहा मतदार संघांमधल्या ४८ बॅलेट युनिटस, ३१ कंट्रोल युनिटस आणि ३१ व्हीव्हीपॅटच्या चाचण्या घेण्यात आल्या. या चाचणीमध्ये मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट पावत्यांच्या मोजणीत कसलीही तफावत आढळली नाही.

पनवेल, अलिबाग, अर्णी, येवला, चंदगड, कोल्हापूर उत्तर या मतदान संघांमधल्या, तसंच माजलगाव मतदार संघांमधल्या उर्वरीत तीन मतदान यंत्रांच्या संचावर मॉक पोलची चाचणी घेण्यात आली. त्याच्या आधी आणि नंतरही अधिकृत अभियंत्यांनी या यंत्रांची चाचणी घेतली. या चाचणीतही व्हीव्हीपॅट पावत्यांच्या मोजणीत तफावत आढळली नाही, असं निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

कोपरी-पाचपाखडी, ठाणे, खडकवासला आणि माजलगाव या मतदार संघांमध्ये बर्न्ट मेमरी आणि मायक्रो कंट्रोलरची तपासणी करण्यासाठी चाचण्या घेण्यात आल्या. त्यातही सर्व मतदान यंत्रं योग्य ठरल्याचा निर्वाळा इसीआयएल या उत्पादक कंपनीच्या अधिकृत अभियंत्यानी दिला.

<><><><>

बुद्धीबळ विश्वचषक विजेती दिव्या देशमुख हिला ३ कोटी रुपयांचा पुरस्कार देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. तिच्या प्रशिक्षकांना ३० लाख रुपये दिले जाणार आहेत. यासंदर्भातला शासन आदेश सरकारनं आज जारी केला. येत्या शनिवारी नागपूरमध्ये

तिचा सत्कार केला जाणार आहे. भारताच्या कोनेरु हंपीला अंतिम फेरीत पराभूत करुन तिनं विश्वचषकात विजय मिळवला होता.

<><><>

राज्य सरकारनं आदिवासीबहुल आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांसाठी सुधारित आरक्षण आणि बिंदूनामावली निश्चित केली आहे. यानुसार अनुसूचित जातींसाठी कमाल १३ टक्के आणि अनुसूचित जमातींसाठी कमाल २४ टक्के आरक्षण देण्यात आलं आहे.

नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली यामध्ये हे प्रमाण लागू होईल.

<><><>

गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लोकमान्य टिळक टर्मिनस ते मडगाव दरम्यान ६ अतिरिक्त विशेष रेल्वे गाड्या चालवण्यात येणार आहेत. आधी जाहीर करण्यात आलेल्या २९६ गणपती विशेष रेल्वे गाड्यांव्यतिरिक्त या ६ गाड्या चालवण्यात येणार असून यामुळे आता गणपती विशेष रेल्वेगाड्यांची एकूण संख्या ३०२ झाली आहे. या गाड्यांसाठीचं आरक्षण पुढच्या महिन्यात ५ तारखेपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसंच www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल.

<><><>

मिठी नदीतल्या गाळ काढण्यासंदर्भातल्या घोटाळ्याच्या चौकशीसाठी ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने आज मुंबईत आठ ठिकाणी छापे टाकले. मिठी नदीतून काढलेल्या गाळासंदर्भात मुंबई महानगरपालिकेबरोबर बनावट सामंजस्य करार केल्याचा आरोप असलेल्या कंत्राटदारांच्या ठिकाणांवर हे छापे टाकण्यात आले.

<><><>

नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून वाईस ॲडमिरल क्रिष्णा स्वामीनाथन यांनी आज पदभार स्वीकारला. वाईस ॲडमिरल संजय सिंग चार दशकांच्या सेवेनंतर निवृत्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर स्वामिनाथन रुजू होणार आहेत.

<><><>

भाजपाच्या माजी खासदार, आमदारांनी एक-एक मंडल दत्तक घेऊन संघटनात्मक बांधणीचा संकल्प करण्याचं आवाहन भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केलं आहे. ते आज मुंबईत माजी आमदार आणि खासदारांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी भाजपाचे अनेक आमदार आणि खासदार उपस्थित होते. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक स्थितीचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला.

<><><><>

राष्ट्रसेविका समितीच्या माजी प्रमुख संचालक प्रमिलाताई मेढे यांचं आज नागपुरात वार्धक्यानं निधन झालं. त्या ९७ वर्षांच्या होत्या. त्यांचं पार्थिव नागपूरच्या देवी अहल्या मंदिरात अंतिम दर्शनासाठी ठेवलं आहे. प्रमिलाताईंच्या इच्छेनुसार त्यांचा देह एम्स रुग्णालयाला दान केला जाणार आहे. १९७८ पासून कार्यवाहिका म्हणून, तर २००३ ते २००६ या काळात प्रमुख संचालक पद त्यांनी भूषवलं. त्यांना नागपूर विद्यापीठानं डी लिट नं सन्मानित केलं होतं. त्यांच्या निधनाबद्दल विविध मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

//<><><><>//